आजचे पंचांग

दिनांक : १ जुलै २०२६ वार : बुधवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : प्रथम तिथी (सकाळी ०७:३८ पर्यंत) त्यानंतर द्वितीया तिथी नक्षत्र : पूर्वाषाढा नक्षत्र (सकाळी ०६:५० पर्यंत) त्यानंतर उत्तराषाढा नक्षत्र योग : इन्द्र योग (सायंकाळी ०४:०३ पर्यंत) त्यानंतर वैधृति योग करण : कौलव करण (सकाळी ०७:३८ पर्यंत)

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. १ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - २७६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### घरफोडीप्रकरणातील आरोपीला श्रीगोंद्यातून अटक

**पुणे** : पुणे शहरातील विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन घरफोडीच्या गुन्ह्यांतील फरार आरोपीला श्रीगोंदा शहरातून अटक करण्यात विश्रांतवाडी पोलिसांना यश आले. श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या सहकार्याने वेशांतर करून ही कारवाई करण्यात आली.

विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २९१/२०२६ व गुन्हा क्रमांक १५५/२०२५ असे दोन घरफोडीचे गुन्हे बीएनएस कलम ३०५(अ) व ३३१(४) अन्वये दाखल आहेत. या गुन्ह्यांतील आरोपी अमीर शिंदे (रा. आढळगाव, ता. श्रीगोंदा) हा श्रीगोंदा परिसरात असल्याची गोपनीय माहिती विश्रांतवाडी पोलिसांना मिळाली होती.

## सारांश वृत्त

### सकारात्मक विचार' नव्हे, ठोस निर्णय कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विविध योजना आणि विकासकामांबाबत सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले. मात्र, प्रत्येक अधिवेशनात सकारात्मक विचार आणि निधीची तरतूद अशीच आश्वासने दिली जातात, पण अनेक प्रकल्प मंजुरी, निधी आणि अंमलबजावणीअभावी वर्षानुवर्षे रखडलेले आहेत.

नागरिकांना घोषणांपेक्षा प्रत्यक्ष विकास हवा आहे. सरकारने कोणते प्रकल्प, किती निधी आणि कोणत्या कालमर्यादेत पूर्ण होणार याचा स्पष्ट रोडमॅप जाहीर केल्याशिवाय सकारात्मक भूमिका हा केवळ राजकीय दिलासा ठरेल.:::

### कच्चे तेल घटले, पेट्रोल-डिझेलच्या किंमती ताबडतोब कमी करा : ट्रम्प ■

दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पेट्रोल-डीजल विक्री करणाऱ्या कंपन्या आणि पेट्रोल पंप चालकांना इंधनाचे दर तातडीने कमी करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती घसरून ६८ डॉलर प्रति बॅरलवर आल्या आहेत, तरीही ग्राहकांना त्याचा फायदा मिळत नसल्याने ट्रम्प यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'ट्रुथ सोशल'वर लिहिलेल्या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी तेल कंपन्यांना थेट इशारा दिला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, जागतिक बाजारात तेल सातत्याने स्वस्त होत असतानाही सामान्य नागरिकांना अजूनही गरजेपेक्षा जास्त किंमत मोजावी लागत आहे.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरण : केवळ आश्वासन नव्हे, तर ठोस राजकीय बांधिलकीची वेळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत चर्चा, सूचना आणि हरकती विचारात घेतल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल असे स्पष्ट केले. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याची ग्वाहीही दिली. ही भूमिका प्रक्रियात्मकदृष्ट्या योग्य असली, तरी अनुसूचित जातींतील वंचित समाजघटकांच्या दृष्टीने आता केवळ आश्वासने पुरेशी राहिलेली नाहीत. त्यांना स्पष्ट राजकीय इच्छाशक्ती, वेळबद्ध कृती आणि ठोस बांधिलकी अपेक्षित आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला घटनात्मक मान्यता देताना त्यामागील मूलभूत उद्देश स्पष्ट केला आहे. आरक्षणाचा लाभ काही मोजक्या प्रगत घटकांपुरता मर्यादित न राहता, सर्वाधिक मागे राहिलेल्या समाजघटकांपर्यंत पोहोचला पाहिजे. त्यामुळे उपवर्गीकरणाचा प्रश्न हा कोणत्याही समाजाला कमी-जास्त लेखण्याचा नसून, सामाजिक न्याय अधिक प्रभावी करण्याचा आहे.

महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या ५८ जाती आहेत. गेल्या अनेक दशकांतील वास्तव पाहिले, तर आरक्षणाच्या लाभांचे समान वितरण झालेले नाही. अनेक जाती आजही शिक्षण, सरकारी नोकऱ्या, प्रशासन, उच्च शिक्षण आणि प्रतिनिधित्व या सर्व क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात मागे आहेत. त्यामुळे उपवर्गीकरणाचा मुद्दा हा नवीन नसून, दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या सामाजिक न्यायाच्या मागणीचा भाग आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी बदर समितीचा अहवाल, सूचना आणि हरकती यांचा विचार करून निर्णय घेतला जाईल असे सांगितले आहे. ही प्रक्रिया आवश्यक असली तरी ती अनिश्चित काळासाठी लांबली, तर वंचित समाजाचा शासनावरील विश्वास कमी होऊ शकतो. समित्यांचे अहवाल, अभ्यास आणि चर्चांची प्रक्रिया अनेकदा वर्षानुवर्षे सुरू राहते; मात्र प्रत्यक्ष निर्णय पुढे ढकलले जातात. त्यामुळे सरकारने या प्रक्रियेसाठी स्पष्ट कालमर्यादा जाहीर करणे आवश्यक आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून नेतृत्वाची कसोटी आहे. त्यांनी जर सामाजिक न्यायाचा प्रश्न खऱ्या अर्थाने प्राधान्याने हाताळला, तर त्यातून वंचित अनुसूचित जाती समाजात विश्वास निर्माण होईल. परंतु जर हा विषय केवळ समित्या, अभ्यास आणि राजकीय समतोल साधण्यापुरता मर्यादित राहिला, तर सरकारवर वेळकाढूपणाचा आरोप होणे स्वाभाविक आहे. विशेषतः राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर सरकारने संवाद अधिक व्यापक करणे आवश्यक आहे. सर्व ५८ अनुसूचित जातींच्या प्रतिनिधींना समान संधी देऊन त्यांची मते ऐकली पाहिजेत. कोणत्याही एका गटाच्या दबावाखाली किंवा राजकीय समीकरणांच्या आधारे निर्णय घेतला जात असल्याचा संशय निर्माण होणार नाही, याची काळजी शासनाने घ्यावी. मुख्यमंत्र्यांनी कर्नाटकसह इतर राज्यांचा उल्लेख केला. मात्र महाराष्ट्राने केवळ इतर राज्यांचे अनुकरण न करता, स्वतःच्या सामाजिक वास्तवावर आधारित, पारदर्शक आणि आकडेवारीवर आधारलेला निर्णय घ्यावा. उपवर्गीकरणाचा पाया वस्तुनिष्ठ सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाच्या अभ्यासावरच उभा राहिला पाहिजे. त्यासाठी बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करून त्यावर खुली चर्चा घडवून आणण्याची मागणीही रास्त मानली जाऊ शकते. आज वंचित अनुसूचित जाती समाजाला घोषणांपेक्षा कृतीची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने मार्ग मोकळा करून दिला आहे; आता राज्य सरकारने तो मार्ग वेळेवर आणि प्रामाणिकपणे स्वीकारण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्याची भूमिका मांडली आहे. आता त्या भूमिकेला वेळबद्ध कृती आराखडा, पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि सर्व समाजघटकांचा विश्वास संपादन करणारे नेतृत्व यांची जोड देणे आवश्यक आहे. अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण हा केवळ कायदेशीर किंवा प्रशासकीय विषय नाही; तो सामाजिक न्याय, समान संधी आणि घटनात्मक मूल्यांशी संबंधित आहे. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नावर केवळ प्रक्रियेची नव्हे, तर वंचित समाजाच्या न्याय्य हक्कांप्रती ठाम राजकीय बांधिलकी दाखविण्याची हीच योग्य वेळ आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : नागपूर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राजकीय बालेकिल्ले मानले जाते. राज्याचे मुख्यमंत्री ज्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतात, त्या जिल्ह्यात एका स्वयंसेवी संस्थेत कार्यरत महिलेला कथित लैंगिक छळ, मानसिक त्रास आणि बनावट सोशल मीडिया खात्यांद्वारे पाळत ठेवल्याच्या आरोपांमुळे गुन्हा दाखल होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. अशा घटनेनंतर सरकारने कारवाईचे आश्वासन दिले असले, तरी या घटना घडूच कशा दिल्या गेल्या, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दोषींवर कठोर कारवाई होईल आणि निर्दोषांवर अन्याय होणार नाही, असे सांगितले. आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल झाल्याची माहितीही त्यांनी दिली. ही प्रक्रिया आवश्यक आहे; मात्र प्रशासनाची खरी कसोटी गुन्हा घडल्यानंतर नव्हे, तर तो घडूच न देण्यात असते.

या प्रकरणात तपासानुसार महिलेचा मानसिक छळ, अश्लील वर्तन आणि बनावट सोशल मीडिया खात्यांद्वारे तिच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. यावरून कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षेसाठी असलेल्या यंत्रणा किती प्रभावी आहेत, हा प्रश्न उपस्थित होतो. संबंधित संस्थेत अंतर्गत तक्रार समिती (खपींशअॅपरश्र ऊेश्रिळपी ऊाळींशश) कार्यरत होती का? महिलांनी यापूर्वी तक्रारी केल्या होत्या का? केल्या असतील तर त्यावर काय कारवाई झाली? या प्रश्नांची उत्तरेही सार्वजनिक झाली पाहिजेत. मुख्यमंत्र्यांनी जबरदस्तीच्या धर्मांतराबाबत तपासात पुरावे आढळले नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रकरणात तपासाने जे निष्कर्ष काढले आहेत, त्यांचाच आधार घेणे आवश्यक आहे. परंतु त्याचवेळी महिलेच्या कथित लैंगिक आणि मानसिक छळाची गंभीरता कोणत्याही इतर मुद्द्यांमुळे झाकोळली जाऊ नये. पीडितेला न्याय मिळणे हेच या प्रकरणाचे केंद्रबिंदू असले पाहिजे.

नागपूर हा राज्याच्या सत्ताकेंद्राशी थेट जोडलेला जिल्हा आहे. त्यामुळे येथे प्रशासन अधिक सतर्क, संवेदनशील आणि उत्तरदायी असेल, अशी नागरिकांची अपेक्षा असते. तरीही अशा घटना समोर येत असतील, तर राज्यातील इतर भागांतील परिस्थितीबाबतही चिंता निर्माण होते. सरकारने केवळ गुन्हा दाखल करून किंवा दोषारोपपत्र सादर करून आपली जबाबदारी संपली असे मानता कामा नये. स्वयंसेवी संस्था, खासगी कार्यालये आणि इतर कार्यस्थळांवर महिलांच्या सुरक्षेच्या नियमांची नियमित तपासणी, अंतर्गत तक्रार समित्यांचे लेखापरीक्षण आणि तक्रारदारांना संरक्षण देण्यासाठी प्रभावी व्यवस्था उभारणे तितकेच आवश्यक आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न हा राजकारणाचा विषय नसून प्रशासनाच्या कार्यक्षमतेची परीक्षा आहे. मुख्यमंत्री स्वतः नागपूरचे प्रतिनिधित्व करत असताना, त्यांच्या जिल्ह्यात अशा प्रकारची घटना घडणे हे शासनव्यवस्थेसाठी चिंतनाचा विषय आहे. त्यामुळे सरकारने केवळ कारवाईची घोषणा न करता अशा घटना पुन्हा घडणार नाहीत यासाठी कोणती ठोस प्रतिबंधात्मक पावले उचलली जाणार आहेत, याचेही स्पष्ट उत्तर जनतेला देणे आवश्यक आहे.

## डिजिटल ग्रामपंचायतींचा कणा असलेल्या संगणक परिचालकांना अजूनही न्याय कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी ग्रामपंचायतींच्या डिजिटल कामकाजात संगणक परिचालकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे मान्य केले. मात्र, ही भूमिका महत्त्वाची मान्य करूनही त्यांना केवळ १०,००० मानधनावर काम करावे लागते, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे.



राज्यभरातील ग्रामपंचायतींचे ऑनलाइन कामकाज, नागरिकांना शासकीय सेवा आणि ई-गव्हर्नन्सची जबाबदारी सांभाळणाऱ्या संगणक परिचालकांच्या मानधन आणि सेवाशर्तींचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सरकारने सकारात्मक विचार आणि कार्यवाही सुरू आहे अशी भूमिका पुन्हा मांडली आहे; मात्र आता आश्वासनांपेक्षा ठोस निर्णयाची अपेक्षा आहे. जर संगणक परिचालक हे ग्रामीण डिजिटल प्रशासनाचा कणा असतील, तर त्यांच्या कामाला योग्य मानधन, नोकरीची सुरक्षितता आणि स्पष्ट सेवाशर्ती देणे ही सरकारची जबाबदारी आहे.

## बिश्नोई टोळीच्या वाढत्या कारवायांमागे नेमका कोणाचा हात?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत बिश्नोई टोळीविरुद्ध कठोर कारवाई सुरू असल्याचे सांगितले. काही आरोपींना अटक झाली असून, परदेशातून खंडणीच्या धमक्या देणाऱ्या इतर आरोपींचा शोध सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली. मात्र या प्रकरणातून एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो.

बिश्नोई टोळी जर परदेशात बसून महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांना खंडणीच्या धमक्या देत असेल, स्थानिक पातळीवर शूटर उपलब्ध होत असतील, शस्त्रे मिळत असतील आणि संवेदनशील ठिकाणांवर हल्ले घडवून आणले जात असतील, तर या संपूर्ण साखळीला राज्याच्या आतून कोण मदत करत आहे?

कोणतीही संघटित गुन्हेगारी टोळी केवळ परदेशातून फोन करून इतक्या प्रभावीपणे कार्य करू शकत नाही. त्यासाठी स्थानिक माहिती पुरवणारे, आर्थिक व्यवहार सुलभ करणारे, शस्त्रांची उपलब्धता करून देणारे, आश्रय देणारे आणि लक्ष्यांची माहिती देणारे जाळे आवश्यक असते. त्यामुळे तपास केवळ गोळीबार करणाऱ्या किंवा धमक्या देणाऱ्या व्यक्तींपुरता मर्यादित न राहता, या टोळीच्या स्थानिक समर्थक, आर्थिक पुरवठादार आणि संपूर्ण नेटवर्कपर्यंत पोहोचला पाहिजे. सरकारने काही आरोपींना अटक केली, मकोकाअंतर्गत कारवाई केली आणि व्यापाऱ्यांना संरक्षण दिले, ही महत्त्वाची पावले आहेत. पण जनतेला हे जाणून घेण्याचा अधिकार आहे की, महाराष्ट्रात या टोळीला स्थानिक स्तरावर मदत करणारे कोण आहेत? ते गुन्हेगारी टोळ्यांशी, हवाला रॅकेटशी किंवा इतर आर्थिक साखळ्यांशी जोडलेले आहेत का? या सर्व बाबींची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

# नागपूरच्या दूषित पाणी पुरवठ्यावर गंभीर प्रश्न; देवेंद्र फडणवीसांच्या भूमिकेशी जोडत सरकारची चौकशी व कारवाईची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : नागपूर शहरातील काही भागांत दूषित पाणी पुरवठ्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर अखेर शासनाला चौकशीची भूमिका घ्यावी लागत आहे. मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केले की या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल. हा मुद्दा आमदार भाई जगताप यांनी उपस्थित केला, तर परिणय फुके यांनीही उपप्रश्न विचारून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

या संपूर्ण प्रकरणात पाणी गुणवत्ता तपासणीपासून ते पाईपलाईन दुरुस्ती, जलशुद्धीकरण व्यवस्था आणि वितरण प्रणालीतील त्रुटी यापर्यंत गंभीर कमतरता असल्याचे संकेत मिळत आहेत. संबंधित कंपनीने करारातील अटी पूर्ण केल्या आहेत का, याचीही सखोल पडताळणी केली जाणार असून उल्लंघन आढळल्यास कराराचा पुनर्विचार किंवा कारवाईची शक्यता व्यक्त



करण्यात आली आहे. या मुद्द्याच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहरातील आमदारांची एक समिती स्थापन करून संपूर्ण प्रकरणाचा अभ्यास करण्याची घोषणा करण्यात आली आहे. नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणीपुरवठा मिळणे हा मूलभूत हक्क असल्याचे सरकारकडून सांगितले जात असले तरी प्रत्यक्ष व्यवस्थेतील त्रुटी याच दाव्याला छेद देताना दिसत आहेत. या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील नागपूर शहरातील प्रशासकीय यंत्रणेवरही अप्रत्यक्षपणे जबाबदारी येते, कारण शहरातील पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा आणि नागरी सेवा व्यवस्थापनाची अंतिम राजकीय जबाबदारी त्यांच्या कार्यकाळाशी जोडली जाते. त्यामुळे केवळ चौकशीच्या घोषणा पुरेशा नसून, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि जबाबदारी निश्चित करणे ही खरी कसोटी ठरणार आहे.

# एआयसाठी एसओपी पुरेशी ठरणार का? सरकारकडे आवश्यक तज्ज्ञता आणि क्षमता आहे का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) चा वाढता वापर लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने एआयच्या वापराबाबत स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर (एसओपी) तयार करण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे. गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत ही माहिती देताना नागरिकांच्या गोपनीयतेचे संरक्षण, एआयचा गैरवापर रोखणे आणि पोलिसांना आवश्यक प्रशिक्षण देण्यावर भर दिला. ही घोषणा स्वागतार्ह असली तरी एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतोसरकारकडे एआयसारख्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचे सर्वांगीण आकलन आणि नियमन करण्यासाठी पुरेशी तज्ज्ञता आहे का?

एआय हे केवळ संगणक किंवा सॉफ्टवेअरचे तंत्रज्ञान राहिलेले नाही. आज ते सायबर सुरक्षा, आरोग्य, न्यायव्यवस्था, पोलिस तपास, शिक्षण, बँकिंग, संरक्षण, डिजिटल फसवणूक, माध्यमे आणि सार्वजनिक प्रशासन अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात वापरले जात आहे. अशा परिस्थितीत केवळ प्रशासकीय समिती किंवा पारंपरिक सरकारी प्रक्रियांद्वे एआयचे प्रभावी नियमन करणे सोपे नाही.

राज्य सरकारने ३० दिवसांत तज्ज्ञ समिती स्थापन करून चार ते सहा महिन्यांत अहवाल मागवण्याची घोषणा केली आहे. मात्र, सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या समितीत कोण असतील? केवळ निवृत्त अधिकारी किंवा प्रशासकीय अनुभव असलेल्या व्यक्तींनी अशी समिती बनली, तर ती एआयच्या तांत्रिक, नैतिक, कायदेशीर आणि सामाजिक पैलूंना न्याय देऊ शकेल का?

एआयचा वेग इतका प्रचंड आहे की, आज तयार केलेली नियमावली काही महिन्यांतच कालबाह्य होण्याची शक्यता असते. जनरेटिव्ह एआय, डीपफेक, स्वयंचलित निर्णय प्रणाली, चेहरा ओळख तंत्रज्ञान, मोठी भाषा मॉडेल्स (LaA°ge Language Models), बायोमेट्रिक विश्लेषण आणि एआय-आधारित सायबर हल्ले यांसारख्या क्षेत्रांमध्ये दररोज नवीन घडामोडी होत आहेत. त्यामुळे एआयसाठी प्रभावी धोरण तयार करायचे असेल, तर समितीत संगणक विज्ञान, डेटा सुरक्षा, सायबर कायदा, मानवी हक्क, नैतिकता, डिजिटल फॉरेन्सिक, उद्योग आणि शैक्षणिक संशोधन क्षेत्रातील स्वतंत्र तज्ज्ञांचा समावेश असणे आवश्यक आहे.




सरकारसमोर आणखी एक मोठे आव्हान म्हणजे कौशल्यांची कमतरता. जगभरातील सर्वोत्तम एआय तज्ज्ञ मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या, संशोधन संस्था किंवा स्टार्टअप्समध्ये कार्यरत आहेत. सरकारी यंत्रणेला अशा दर्जाचे तज्ज्ञ आकर्षित करणे आणि दीर्घकाळ त्यांच्यासोबत काम करणे हे सहज शक्य नसते. त्यामुळे सरकारने केवळ समिती स्थापन करण्यापेक्षा उद्योग, विद्यापीठे आणि संशोधन संस्थांसोबत सातत्यपूर्ण भागीदारी निर्माण करणे अधिक महत्त्वाचे ठरेल.

पोलिसांना एआयविषयक प्रशिक्षण देण्याची घोषणाही करण्यात आली आहे. मात्र प्रशिक्षण म्हणजे फक्त एखादा अल्पकालीन अभ्यासक्रम नव्हे. डीपफेक ओळखणे, डिजिटल पुरावे जतन करणे, एआय-आधारित फसवणुकींचा तपास करणे, अल्गोरिद्मिक पक्षपात समजून घेणे आणि गोपनीयतेचे संरक्षण करणे यासाठी सातत्यपूर्ण आणि अद्ययावत प्रशिक्षण आवश्यक आहे. अन्यथा तंत्रज्ञान गुन्हेगारांच्या हातात वेगाने पोहोचेल आणि तपास यंत्रणा मागे पडतील. याचबरोबर सरकारने स्वतःच्या एआय वापरावरही समान निकष लागू करणे गरजेचे आहे. नागरिकांवर देखरेख ठेवण्यासाठी, चेहरा ओळख प्रणाली वापरण्यासाठी किंवा मोठ्या प्रमाणात वैयक्तिक माहितीचे विश्लेषण करण्यासाठी एआयचा वापर होत असेल, तर त्याबाबत पारदर्शकता, कायदेशीर अधिकार, स्वतंत्र देखरेख आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण या बाबी स्पष्ट असल्या पाहिजेत. अन्यथा गोपनीयतेबाबत व्यक्त केलेली चिंता केवळ घोषणांपुरती मर्यादित राहील.

एआयच्या नियमनात एकाच एसओपीवर अवलंबून राहणेही पुरेसे ठरणार नाही. तंत्रज्ञान बदलत राहते, त्यामुळे धोरणे आणि नियमांचाही नियमित आढावा घेण्याची यंत्रणा आवश्यक आहे. समितीने एक अहवाल दिला आणि त्यानंतर प्रक्रिया थांबली, तर काही वर्षांत ती संपूर्ण चौकट अप्रासंगिक ठरू शकते. सरकारने उद्योग, स्टार्टअप्स, शैक्षणिक संस्था, न्यायव्यवस्था, नागरी समाज आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ यांना सहभागी करून बहुपक्षीय सल्लामसलत करणे आवश्यक आहे. सार्वजनिक मसुदा प्रसिद्ध करून नागरिकांकडून सूचना मागवणे, एआयच्या वापरासाठी जोखीम-आधारित वर्गीकरण करणे आणि नियमित स्वतंत्र लेखापरीक्षणाची व्यवस्था करणे ही पावलेही तितकीच महत्त्वाची आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगत औद्योगिक राज्याकडून एआयसंदर्भात देशासाठी आदर्श धोरणाची अपेक्षा आहे. परंतु ती अपेक्षा पूर्ण करण्यासाठी केवळ समिती स्थापन करणे पुरेसे ठरणार नाही. सरकारकडे आवश्यक तांत्रिक क्षमता, स्वतंत्र आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, सातत्याने अद्ययावत होणारी धोरणे आणि पारदर्शक अंमलबजावणी यांची सांगड घालावी लागेल.

## संपादकीय

### 'एसआयआर'च्या वर्षपूर्तीनिमित्ताने...

निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना पत्रे पाठवून आपले प्रतिनिधी एसआयआर प्रक्रियेसाठी पाठविण्याची विनंती केली आहे. या आवाहनाला प्रतिसाद देऊन विरोधकांनी या प्रक्रियेत सहभागी होणे निकोप लोकशाहीच्या दृष्टीने आवश्यक आहे. मात्र तेवढे नैतिक बळ विरोधकांत आहे का?

निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणीची (एसआयआर) प्रक्रिया सुरू होऊन एक वर्ष पूर्ण झाले आहे. ही प्रक्रिया देशाच्या एकात्मतेसाठी आणि अखंडतेसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सिद्ध झाले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी २४ जून २०२५ रोजी बिहारमध्ये प्रायोगिक मोहीम सुरू करण्यात आली होती. या प्रक्रियेमुळे आतापर्यंत देशभरात जवळपास सहा कोटी नावे मतदारयादीतून वगळली गेली आहेत. १९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारयाद्यांमधील त्रुटी दूर करण्याची ही मोहीम अजूनही सुरूच आहे. बिहारमध्ये प्रारंभी राबवण्यात आलेल्या या मोहिमेनंतर तेथील मतदारयादीतून जवळपास ६५ लाख नावे वगळण्यात आली होती. बिहारमध्ये पहिल्याच टप्प्यात या प्रक्रियेनुसार ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली होती. त्यावेळी विरोधकांनी विशेषतः युवराज राहुल गांधींनी एकच गोंधळ केला होता. भारतीय जनता पक्षाचे विरोधक असणारे अल्पसंख्यांक म्हणजे मुस्लिम मतदारांची नावे वगळण्यासाठी ही मोहीम उघडण्यात आल्याचा आरोप राहुल गांधींनी नेहमीप्रमाणे आरडाओरड करीत केला होता. विशेष म्हणजे ज्यांची नावे वगळण्यात आली होती त्या मतदारांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली नाही. आपल्याकडे निवडणूक आयोगाने मागितलेली सर्व कागदपत्रे असूनही आपले नाव मतदारयादीत नसल्याबद्दल एकाही मतदाराने सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयात दाद मागितली नाही. मतदारयादीतून घुसखोरांची नावे वगळणे आणि त्यापुढे जाऊन त्यांना आपल्या देशातून बाहेर काढणे हा केंद्र सरकारचा मुख्य उद्देश असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे. या देशाचा खरा नागरिक असलेली एकही व्यक्ती या पुनर्गणनेतून सुटू नये आणि बाहेरून येऊन इथे विष पसरवणारे साप सुयोग्य पद्धतीने वगळले जावेत यासाठी ही सारी यंत्रणा कार्यरत असणार आहे. एकही खरा नागरिक यातून सुटू नये आणि एकाही घुसखोराला वगळल्याशिवाय राहू नये अशा सुस्पष्ट धोरणाने ही प्रक्रिया सुरू झाल्याने घुसखोरांची पाठराखण करणारे अनेक पक्ष, नेते हवालदिल झाले आहेत. या प्रक्रियेविरोधात काही विरोधक न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच निकाल देत 'एसआयआर'ची प्रक्रिया राबवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असल्याचे स्पष्ट केले आहे. मतदारयादी पुनर्निरीक्षणाला घेतले गेलेले सर्व आक्षेपही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले आहेत. या प्रक्रियेची व्यापकता पाहता त्यात कोणाचे अधिकार नाकारले गेले असे म्हणण्यास वाव नाही. एसआयआर प्रक्रियेत नोटीस देणे, नागरिकांची बाजू ऐकणे, हरकतींची नोंद घेणे, त्यावर कार्यवाही करणे आणि अपिलाच्या अधिकाराची तरतूद अशी आवश्यक खबरदारी घेतली गेली होती. मतदारयादीत नाव येण्यासाठी जी कागदपत्रे मागितली गेली होती त्यात कोणतीही मनमानी नव्हती. गेल्या अनेक दशकांमध्ये ही प्रक्रिया राबवली गेली नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात नावे गाळली जाणे साहजिक होते. आधीच्या मतदारयादीत नाव असणे याचा अर्थ एसआयआर पडताळणीनंतरही ते कायम राहील असा नाही. देशातील निवडणूक मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात होण्यासाठी मतदारयाद्या स्वच्छ होणे अतिशय गरजेचे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्टपणे नमूद केले होते. विशेष म्हणजे राहुल गांधींनी मतदारयादीतील अशाच त्रुटींबद्दल निवडणूक आयोगाला जबाबदार ठरवले होते. त्यासाठी राहुल गांधींनी अनेक पत्रकार परिषदा घेऊन पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन वगैरे करून मतदारयाद्यांमध्ये खंडीभर चुका असल्याचे दाखवून दिले होते. याच चुका दुरुस्त करण्यासाठी सुरू केलेल्या प्रक्रियेला मात्र त्यांनी जोरदार आक्षेप घेतला.

देशात मतदारयाद्यांची गेल्या २० वर्षांत दुरुस्ती झालेली नसल्याने मतदारयाद्यांमध्ये दुबार नावे, स्थलांतरित मतदारांची अपूर्ण माहिती आणि मृत व्यक्तींची नावे कायम राहतात. झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्याने अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नाव नोंदवले. मात्र, जुन्या ठिकाणाहून नाव कमी केले नसल्याच्या घटनाही अनेक आहेत. मतदार याद्या अधिक अचूक आणि पारदर्शक करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बूथ लेव्हल एजंट) नियुक्त करण्याचे आवाहन राजकीय पक्षांना करण्यात आले आहे. याचा अर्थ निवडणूक आयोग सर्व राजकीय पक्षांच्या सहकार्याने ही मोहीम राबवित आहे. उद्धव ठाकरेंच्या, काँग्रेसच्या, शरद पवार गटाच्या किती कार्यकर्त्यांनी या मोहिमेत भाग घेत बूथ लेव्हल एजंट नेमले आहेत? ही प्रक्रिया निर्दोष व्हावी यासाठी विरोधी पक्षांनी सुद्धा त्यात सहभागी होणे आवश्यक आहे. पण तेवढे कार्यकर्ता बळ विरोधकांकडे शिल्लक असायला तर हवे ना? असलेल्या कार्यकर्त्यांनी चिकाटीने या प्रक्रियेत सहभागी होण्याची इच्छाशक्ती दाखवली पाहिजे. या प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल ऑफिसर घरोघरी जाऊन मतदारांच्या माहितीची खातरजमा करतात.

# पवना पाइपलाइनवर निर्णायक बैठक; मावळच्या पाण्यावर शहराचा हक्क की शेतकऱ्यांचा अधिकार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरासाठी प्रस्तावित पवना धरणाच्या बंदिस्त जलवाहिनी (पाइपलाइन) प्रकल्पावर ३ जुलै रोजी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होणारी बैठक निर्णायक ठरणार आहे. मात्र या बैठकीपूर्वीच मावळमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, विकासाच्या नावाखाली मावळच्या जलस्रोतांवर गदा आणली जात असल्याचा आरोप शेतकरी आणि विविध संघटनांनी केला आहे.

शेतकरी संघटनांनी स्पष्ट भूमिका घेत, शहराला पाणी देण्यास आमचा विरोध नाही; पण त्यासाठी मावळच्या नदीचा जीव गुदमरवू नका, असा इशारा शासनाला दिला आहे. बंदिस्त पाइपलाइनमुळे पवना नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर परिणाम होऊन शेती, पर्यावरण, भूजल पातळी, पशुपालन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला दीर्घकालीन फटका बसू शकतो, अशी गंभीर भीती त्यांनी व्यक्त केली आहे.



शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पवना नदीच्या पाण्यावर तब्बल १० ते १५ हजार एकर बागायती शेती अवलंबून आहे. भाजीपाला, फुलशेती, ऊस, फळबागा आणि दुग्धव्यवसाय या सर्वांचा कणा नदीतील सातत्यपूर्ण प्रवाह आहे. नदी कोरडी पडली तर केवळ शेतीच नव्हे, तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थाच संकटात येईल, असा दावा करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, शेतकऱ्यांनी केवळ विरोधाची भूमिका न घेता व्यवहार्य पर्यायही शासनासमोर ठेवला आहे. सध्याप्रमाणे धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्याची व्यवस्था कायम ठेवावी आणि पिंपरी-चिंचवडसाठी आवश्यक पाणी गहुंजे परिसरातून उचलून शहराकडे वळवावे, अशी त्यांची मागणी आहे. या पर्यायामुळे शहरालाही पाणी मिळेल आणि नदीचा नैसर्गिक प्रवाहही कायम राहील, असे त्यांचे म्हणणे आहे. या प्रश्नाने आता राजकीय स्वरूपही धारण केले आहे. मावळातील विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली आहे. विशेषतः माजी राज्यमंत्री बाळा भेगडे आणि आमदार सुनील शेळके यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून मावळच्या पाण्यासाठी एकसंघ भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक आणि शेतकरी व्यक्त करत आहेत. ३ जुलैच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधी या प्रकल्पाच्या सर्व पैलूंवर चर्चा करणार आहेत. मात्र या बैठकीत केवळ शहराच्या वाढत्या पाण्याच्या गरजांचा विचार होणार की मावळच्या शेतकऱ्यांचे, पर्यावरणाचे आणि भविष्यातील जलसुरक्षेचेही संरक्षण केले जाणार, हा खरा प्रश्न आहे. पवना नदी ही केवळ पाणीपुरवठ्याचा स्रोत नसून मावळच्या कृषी, पर्यावरण आणि ग्रामीण जीवनाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे विकास आणि जलव्यवस्थापनाचा समतोल साधणारा निर्णय घेण्याची जबाबदारी आता राज्य सरकारवर आहे. अन्यथा शहराच्या विकासासाठी ग्रामीण भागाच्या नैसर्गिक हक्कांवर गदा आणल्याचा आरोप अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# विद्यार्थ्यांना अजूनही पीएमपीएमएल बस पास नाही; शैक्षणिक वर्ष सुरू, पण मोफत प्रवासाचा निर्णय रखडला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होऊनही सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी मोफत पीएमपीएमएल बस पास योजना अद्याप सुरू झालेली नसल्याने विद्यार्थी आणि पालकांना आर्थिक फटका बसत आहे. या पार्श्वभूमीवर पाचवी ते बारावीपर्यंतच्या सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांना २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत बस पास सुविधा तातडीने लागू करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार ॲड. सचिन गोडांबे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तसेच पीएमपीएमएलचे अध्यक्ष यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गोडांबे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, वाढत्या महागाईमुळे पालकांवर आधीच शैक्षणिक खर्चाचा मोठा ताण आहे. अशा परिस्थितीत रोजच्या बसभाड्याचाही अतिरिक्त आर्थिक बोजा सहन करावा लागत असून, मोफत बस पास योजना लवकर सुरू करणे आवश्यक आहे.

तसेच, हिंदुस्थान अँटीबायोटिक्स (एचए) सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांनाही या योजनेचा लाभ मिळावा, अशी त्यांनी मागणी केली आहे. सरकारी शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना समान सवलत मिळणे आवश्यक असून, कोणत्याही शाळेतील विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

याशिवाय, गतवर्षी खासगी शाळांतील विद्यार्थ्यांना देण्यात आलेली ७५ टक्के बसभाडे सवलत यंदाही कायम ठेवावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे प्रभावित होऊ नये, यासाठी ही सवलत सुरू ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दरवर्षी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर बस पास योजनेत होणारा विलंब हा विद्यार्थी आणि पालकांसाठी डोकेदुखीचा विषय ठरत आहे. त्यामुळे यंदा तरी प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन मोफत बस पास योजना सुरू करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता महापालिका आणि पीएमपीएमएल प्रशासन या मागणीवर किती तत्परतेने निर्णय घेते, याकडे विद्यार्थी, पालक आणि शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# शिरूरमध्ये जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर :** जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त शिरूर शहरात शिरूर पोलीस स्टेशनच्या वतीने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत विद्याधाम प्रशालेतील सुमारे १०० ते १२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

ही रॅली विद्याधाम प्रशाला येथून सुरू होऊन इंदिरा गांधी पूल, बस स्टँड, जैन मंदिर, पाच कंदील चौक, राम आळी आणि मीते कॉर्नर मार्गे पुन्हा विद्याधाम प्रशालेत समाप्त झाली.

रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम दर्शविणारे फलक (पोस्टर्स) हातात घेत जनजागृती केली. अंमली पदार्थांपासून दूर राहा, निरोगी जीवन जगूया अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

रॅलीनंतर विद्याधाम प्रशालेत आयोजित विशेष कार्यक्रमात शिरूर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक तसेच कायदेशीर परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थांपासून दूर राहून निरोगी जीवनशैली स्वीकारण्याची शपथ घेतली. शालेय विद्यार्थी व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे परिसरात जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे पोहोचल्याचे दिसून आले.

# क्रीडा धोरण अद्याप मंजूर नाही, तरी व्यायामशाळा वाटपाचे प्रस्ताव पुन्हा स्थायी समितीसमोर; महापालिकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्रीडा विभागाशी संबंधित प्रस्तावांबाबत प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेतील विसंगती पुन्हा एकदा समोर आली आहे. काही दिवसांपूर्वी क्रीडा धोरण मंजूर होईपर्यंत अशा कोणत्याही प्रस्तावांना मंजुरी दिली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केली होती. मात्र, त्याच प्रस्तावांना आता पुन्हा स्थायी समितीच्या मंजुरीसाठी विषयपत्रिकेत स्थान देण्यात आल्याने पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

बुधवारी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत तीन महत्त्वाचे प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आले आहेत. त्यामध्ये मासुळकर कॉलनी येथील डॉ. हेडगेवार क्रीडा संकुलातील व्यायामशाळा जागृती स्पोर्ट्स फाउंडेशन या संस्थेला ११ महिन्यांच्या करारावर चालविण्यास देण्याचा प्रस्ताव आहे.

तसेच, कासारवाडी येथील जय महाराष्ट्र व्यायाम मंडळाला व्यायामशाळा आणि बॅडमिंटन हॉल चालविण्याची मुदतवाढ देण्याचा प्रस्तावही विषयपत्रिकेत समाविष्ट करण्यात आला आहे.

याशिवाय प्राधिकरण परिसरातील गुरुवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा श्री लोकेश बागल यांच्या श्री भैरवनाथ मित्र मंडळ संस्थेला चालविण्यास देण्याचा विषयही मंजुरीसाठी समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, हे तिन्ही प्रस्ताव यापूर्वी स्थायी समितीने तहकूब केले होते. कारण, महापालिकेचे नवीन क्रीडा धोरण अंतिम झाल्यानंतरच अशा स्वरूपाच्या व्यायामशाळा वाटप किंवा मुदतवाढीचे निर्णय घेतले जातील, असे अधिकृतपणे सांगण्यात आले होते. मात्र अद्याप क्रीडा धोरणाला अंतिम मंजुरी मिळालेली नसताना हेच प्रस्ताव पुन्हा पुढे आणण्यामागे नेमके कारण काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जर क्रीडा धोरणाशिवायच व्यायामशाळांचे वाटप किंवा मुदतवाढीचे निर्णय घेतले जाणार असतील, तर यापूर्वी प्रस्ताव तहकूब करण्यामागील कारण काय होते? धोरणाची अट केवळ औपचारिकता होती का, की आता ती सोयीस्करपणे बाजूला ठेवली जात आहे, अशी चर्चा महापालिका वर्तुळात सुरू झाली आहे.

महापालिकेच्या क्रीडा सुविधांचे व्यवस्थापन पारदर्शक, समान निकषांवर आणि धोरणात्मक चौकटीत होणे अपेक्षित असताना, धोरण मंजुरीपूर्वीच प्रस्तावांना हिरवा कंदील देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही होत आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावांवर नेमका काय निर्णय घेतला जातो आणि प्रशासन या भूमिकेचे स्पष्टीकरण कसे देते, याकडे क्रीडा क्षेत्र, सामाजिक संस्था आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# गाण्यांनी वैतागून शेजाऱ्यावर जीवघेणा हल्ला; तळेगाव एमआयडीसी हद्दीत एकाला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ठाकरवस्ती (इंदोरी, मावळ) येथे गाणी मोठ्या आवाजात वाजवल्याच्या कारणावरून शेजाऱ्यांमध्ये जुनाट वाद उफाळून आला. फिर्यादी महेश शंकर शिंदे यांच्या घरात गाण्याचा आवाज जास्त येत असल्याचा आरोप करत शेजारी राहणारा आरोपी दीपक गायकवाड याने वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन आरोपीने फिर्यादीच्या डोक्यात, कानावर आणि मानेवर लाकडी दांडक्याने जबर मारहाण केली. यात फिर्यादी गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डाव्या कानातून रक्तस्राव झाला. फिर्यादीच्या पत्नीलाही आरोपीच्या पत्नीने शिवीगाळ व दमदाटी केली. या प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी दीपक गायकवाड याला अटक केली असून त्याची पत्नी अद्याप फरार आहे. (तपास अधिकारी: पोहवा/भोजणे).

**बावधनमध्ये अमली पदार्थ विरोधी कारवाई; गांजासह महिला तस्कराला बेड्या**

बावधन पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थांची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नाना मोकाशी यांचे शॉप, जाधववस्ती (रायन स्कुलसमोर, बावधन) येथील रोडवर छापा टाकला. या कारवाईत अमली पदार्थांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या एका महिला आरोपीला पोलिसांनी रंगेहात पकडले. संबंधित महिला आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी १७,००० रुपये किमतीचा ३४० ग्रॅम वजनाचा बेकायदेशीर गांजा जप्त केला आहे. आरोपी महिलेविरुद्ध बावधन पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आली आहे. (तपास अधिकारी: सपोनि थोरबोले).

**सोमाटणे फाट्यावर पोलिसांची धडक कारवाई; बेकायदेशीर पिस्तूल व काडतुसासह दोघे जेरबंद**

शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आयुक्तांनी शस्त्रबंदीचे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. या आदेशाचे सरळ-सरळ उल्लंघन करत असताना, गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमाटणे फाटा येथील 'हॉटेल न्यु डायमंड' समोर सापळा रचला. पोलिसांना पाहताच पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोघांना पथकाने शिताफीने ताब्यात घेतले. आरोपी पप्पू उर्फ विनोद राकेश पवार (वय २६, रा. दत्तनगर, चिंचवड) आणि रोहन सिताराम सावंत (वय २४, रा. दत्तनगर, चिंचवड) यांच्या अंगझडतीत १ गावठी बनावटीचे पिस्तूल आणि १ जिवंत काडतूस मिळून आले. विनापरवाना बेकायदेशीररित्या घातक शस्त्र बाळगल्याप्रकॉरी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. (तपास अधिकारी: पोउपनि मोहरे).

**मुंबई-बेंगलोर हायवेवर पादचाऱ्याला दुचाकीची धडक; बावधन पोलिसांत गुन्हा दाखल**

मुंबई-बेंगलोर हायवेवरील सातारा लेनवर, डोरा फर्निचर दुकानासमोर (बावधन) रस्ता ओलांडणाऱ्या एका पादचाऱ्याला दुचाकी (क्रमांक: एम.एच. १४, एम.एल. ८८५०) चालकाने निष्काळजीपणे गाडी चालवून धडक दिली. या अपघातात फिर्यादी मोहम्मद मसुदमिया अली (वय ५९, रा. सांगवी, मूळ रा. पश्चिम बंगाल) हे जखमी झाले असून, दुचाकी चालकाविरुद्ध बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पिंपरी-चिंचवड पोलिसांचे संबंधित तपास अधिकारी करत आहेत. नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यास सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांतर्फे करण्यात आले आहे.

# तळेगाव दाभाडे येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू; चालक फरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याच्या हद्दीत धन्वंतरी हॉस्पिटल समोर (चाकण बाजूकडून तळेगाव बाजूकडे जाणाऱ्या रोडवर) एक भीषण अपघात झाला. रस्ता ओलांडत असलेल्या एका व्यक्तीला अज्ञात मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने आणि अविचाराने चालवून जोरात धडक दिली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. अपघात घडल्यानंतर आरोपी चालक पोलिसांना माहिती न देता आणि जखमीला कोणतीही वैद्यकीय मदत न करता घटनास्थळावरून पळून गेला. पोलीस सध्या या अज्ञात चालकाचा शोध घेत आहेत. (तपास अधिकारी: पोउपनि/चव्हाण).

**जमीन खरेदी-विक्रीच्या वादातून बावधन येथे तलवारीने/दगडाने मारहाण; एक जण जेरबंद**

बावधन येथील भुगाव रोडवर असलेल्या जिजाई कॅफे जवळील मोकळ्या जागेत जमीन खरेदी-विक्रीच्या एजन्सीवरून जुना वाद उफाळून आला. आरोपी सुनील ऊर्फ बंडू विष्णू जोरी (वय ४०, रा. वारजे, पुणे) याने पूर्वी झालेल्या वादाचा राग



मनात धरून फिर्यादी विजय किसन जोरी आणि त्यांचे सासरे अनिल हिरामण लवांडे यांना गाठले. आरोपीने दोघांनाही बेदम शिवीगाळ करत, जिवे मारण्याची धमकी देऊन दगडाने डोक्यात मारहाण करून गंभीर जखमी केले. बावधन पोलिसांनी या प्रकरणी वेगाने पावले उचलत आरोपी सुनील ऊर्फ बंडू जोरी याला अटक केली आहे. (तपास अधिकारी: सपोनि/थोरबोले).

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### चौथीच्या पुस्तकातच चूक..! रामानुजनांच्या निधनाची तारीख चुकीची; गणिताच्या उदाहरणांतही घोळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** लहान मुलांसाठी शालेय पाठ्यपुस्तक म्हणजे ज्ञानाचा सर्वात विश्वासार्ह स्रोत. पुस्तकात जे लिहिले आहे, तेच बरोबर मानून विद्यार्थी अभ्यास करतात. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील प्रत्येक माहिती अचूक असणे अत्यंत आवश्यक असते. मात्र, राज्यातील चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रकाशित करण्यात आलेल्या बालभारतीच्या नव्या गणिताच्या पुस्तकातच तथ्यात्मक आणि गणितीय त्रुटी आढळल्याने पालक, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांमध्ये नाराजी असून, ही चूक तातडीने दुरुस्त करण्याची मागणी होत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी - २०२०) अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या हातात नवीन पाठ्यपुस्तके पोहोचली आहेत. मात्र, चौथीच्या गणिताच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या पुस्तकातील पान क्रमांक १०९ वर भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या निधनाची तारीख २६ एप्रिल १९२० ऐवजी २७ एप्रिल १९२० अशी छापण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत चुकीची माहिती पोहोचत असल्याची बाब समोर आली आहे.

ही चूक केवळ एका तारखेपुरती मर्यादित नसून 'लांबी व वजन' या धड्यात वजनाच्या संकल्पनेबाबत अयोग्य उदाहरण देण्यात आल्याचे त्यांनी निदर्शनास आणले आहे. तसेच इंग्रजी माध्यमातील 'भागाकार' या धड्यात तीन अंकी संख्येला एक अंकी संख्येने भाग देण्याच्या प्रक्रियेतही त्रुटी असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शिक्षण तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा पाया याच पुस्तकांवर उभा राहतो. अशा वेळी पाठ्यपुस्तकांमधील तथ्यात्मक किंवा गणितीय चुका विद्यार्थ्यांच्या संकल्पना चुकीच्या पद्धतीने विकसित करू शकतात. चुकीची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. नवीन अभ्यासक्रमातून गुणवत्तापूर्ण आणि संकल्पनाधारित शिक्षणाचा उद्देश ठेवण्यात आला असला, तरी पाठ्यपुस्तकांतील अशा त्रुटींमुळे त्या उद्देशालाच धक्का बसत असल्याची प्रतिक्रिया शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे. त्यामुळे या सर्व चुका तातडीने दुरुस्त करून सुधारित आवृत्ती उपलब्ध करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या त्रुटी टाळण्यासाठी पाठ्यपुस्तकांची अधिक काटेकोर छाननी करण्याची मागणी पालक आणि शिक्षण अभ्यासकांकडून करण्यात येत आहे.

# टोमॅटो बांधणी अंतिम टप्प्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मेंगडेवाडी, जारकरवाडी, धामणी, पोंदेवाडी, लाखणगाव तसेच शिरूर तालुक्यातील घोलपवाडी परिसरात उन्हाळी हंगामात लागवड केलेल्या टोमॅटो पिकाची बांधणी अंतिम टप्प्यात आली असून, या कामात शेतकरी सध्या व्यस्त असल्याचे चित्र दिसून येत आहे. मजूर टंचाईमुळे शेतकऱ्यांनी परस्पर सहकार्याच्या 'सावड' पद्धतीला प्राधान्य दिले आहे.

उन्हाळी हंगामात १ मेच्या सुमारास तसेच पावसाळी हंगामात १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत अनेक शेतकरी टोमॅटोची लागवड करतात. या कालावधीत लागवड केलेल्या टोमॅटोला बहुतांश वेळा चांगला बाजारभाव मिळतो, असा अनेक वर्षांचा टोमॅटो उत्पादकांचा



अनुभव आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे या काळात वळवाचा किंवा अवकाळी पावसाचा प्रभाव असतो. चालू वर्षीही अवकाळी पावसामुळे अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

योग्य प्रमाणात खतांचा वापर, वेळेवर रोग व कीड नियंत्रणासाठी फवारणी आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनामुळे शेतकरी आपली टोमॅटो बाग चांगल्या स्थितीत राखत असून, त्यांना चांगला बाजारभाव मिळण्याची अपेक्षा आहे.

पूर्व आंबेगाव परिसरात टोमॅटो बांधणीची कामे वेगाने सुरू आहेत. मात्र, मजूर टंचाईमुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

बांधणीसाठी वाढीव मजुरी द्यावी लागत असल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी 'सावड' पद्धतीने ही कामे करण्याचा पर्याय स्वीकारला असल्याची माहिती घोलपवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी भिमाजी घोलप यांनी दिली.

टोमॅटोवर फळमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतात कामगंध सापळे किंवा पिवळे चिकट सापळे लावावेत. सापळ्यांवर चिकटलेल्या माशा पाच-सहा दिवसांनी काढून त्यावर पुन्हा ग्रिस किंवा एरंडेल तेल लावल्यास फळमाशीचे नियंत्रण प्रभावीपणे करता येते, असे अनुभवी टोमॅटो उत्पादकांचे मत आहे.

सध्या काही शेतकऱ्यांची टोमॅटो बांधणी सुरू असून, अनेक शेतकऱ्यांची बांधणी पूर्ण झाली आहे.

> **उत्पादन खर्च वाढला; रोगांचा प्रादुर्भाव चिंताजनक**
>
> टोमॅटोच्या बाजारभावात सातत्याने चढ-उतार होत असले तरी सध्याचे हवामान या पिकासाठी पोषक नाही. करपा, भुरी आदी रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असून झाडांची वाढ खुंटत आहे. तसेच फळांची योग्य फुगवण होत नसल्याने उत्पादनावर परिणाम होत आहे. रोग नियंत्रणासाठी महागडी औषधे वापरावी लागत असल्याने उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे.
>
> **- भिमाजी घोलप, टोमॅटो उत्पादक शेतकरी, घोलप**

## पोंदेवाडी येथे बचत गटाला संकरित बाजरी बियाण्यांचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** पोंदेवाडी (ता. आंबेगाव) येथील शेतकरी बचत गटाला महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग, घोडेगाव यांच्या वतीने संकरित हायब्रीड बाजरी बियाण्यांचे वाटप करण्यात आले. पंचायत समिती सदस्या अंकिता अनिल वाळुंज यांच्या हस्ते, तर कृषी अधिकारी राजेंद्र गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.



यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पूर्व भागात नुकत्याच झालेल्या समाधानकारक पावसामुळे या बियाण्यांची पेरणी योग्य वेळी व चांगल्या प्रकारे होईल, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला. शासनाकडून वेळेवर बियाण्यांचे वाटप झाल्याने शेतकरी वर्गाने समाधान व्यक्त केले.

मात्र, पावसाने चांगली सुरुवात केली असली तरी आगामी काळात शेतीसाठी आणखी पावसाची आवश्यकता असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले.

## पाषाण येथील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण, चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यातील पाषाण येथील सांडपाणी शुद्धीकरण (एसटीपी) प्रकल्पाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, त्याची चौकशी करण्यात येणार असल्याची घोषणा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत केली.



या प्रकल्पासाठी २३ सप्टेंबर २०२२ रोजी सल्लागार नेमण्यात आला, तर फेरनिविदेनंतर सुमारे ४.३१ कोटी रुपयांचे काम मे. परशुराम कन्स्ट्रक्शनला देण्यात आले. मात्र, इतक्या खर्चानंतरही प्रकल्पाची स्थिती समाधानकारक नाही. देखभाल-दुरुस्तीच्या कारणाने काही काळ प्रकल्प बंद राहिला आणि सध्या तो कार्यरत असल्याचा दावा केला जात असला तरी त्याच्या कार्यक्षमतेवर आणि दर्जावरच प्रश्न उपस्थित होत आहेत. मुदत, देखभाल आणि दोषदायित्व कालावधी याबाबत गंभीर त्रुटी झाल्याची शक्यता स्वतः सरकार मान्य करत आहे, ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. दुसरीकडे, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित न ठेवणाऱ्या सोसायट्यांवर कारवाईची भूमिका घेतली जात आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात १२६ पैकी ६२ सोसायट्यांना नोटिसा देण्यात आल्या असून, २४ सोसायट्यांचे नळजोड आधीच तोडण्यात आले आहेत. उर्वरित सोसायट्यांना केवळ १५ दिवसांची अंतिम मुदत देऊन त्यानंतर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

एकूणच, एकीकडे प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील त्रुटी आणि निकृष्ट व्यवस्थापनाबाबत चौकशीची वेळ येते आहे, तर दुसरीकडे नागरिकांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला जात आहे. यामुळे प्रशासकीय जबाबदारी आणि अंमलबजावणीतील असमतोल पुन्हा अधोरेखित होत आहे.

## प्रामाणिक पोलिसांच्या पाठीशी समाजाने उभे रहावे : बाळासाहेब बोराटे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** खेड पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रमाणे आपल्या कर्तव्यात तत्परता दाखविणाऱ्या प्रामाणिक पोलिसांच्या पाठीशी समाजाने उभे रहावे असे आवाहन पिंपरी चिंचवड बस ओनर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब बोराटे यांनी केले.




चांडोली, तालुका खेड राजगुरुनगर येथील ट्रान्सपोर्ट व्यावसायिक ज्ञानेश्वर मारुती मरगज यांच्या रस्त्यावर लावलेल्या ट्रक मधील डिझेलची चोरी झाली. त्याची तक्रार खेड पोलीस ठाण्यात दाखल केली होती. तक्रारीनुसार पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सीसीटीव्ही द्वारे तपास सुरू करून आरोपीला अल्पावधीत जेरबंद केले. या निमित्ताने खेड पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पिंपरी चिंचवड बस ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष दत्तात्रय भेगडे आणि कार्याध्यक्ष दीपक कलापुरे यांच्या मार्गदर्शनात उपाध्यक्ष बाळासाहेब बोराटे, सचिव अरुण काळे, कार्यकारणी सदस्य भाऊसाहेब घोमाल, इरफान पठाण आणि देवदत्त रावल व इतर सभासदांनी शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला.

या तपासात पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली खेड उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे, खेड पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रमोद क्षीरसागर, पोलीस हवालदार संतोष घोलप, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शरद बांबदे, पोलीस हवालदार अतुल डेरे, पोलीस अंमलदार निलेश सुपेकर आणि स्वप्नील गाढवे यांनी तत्परता दाखवली आणि आरोपीस जेरबंद केले. ट्रान्सपोर्ट व्यावसायिक आणि बस वाहतूकदारांच्या अडीअडचणीत मदत करणाऱ्या कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा पुढील काळात देखील गौरव केला जाईल असे बाळासाहेब बोराटे यांनी सांगितले.

## पुणे जिल्ह्यात पंचायत समिती सभापतींची असोसिएशन नवा समन्वय की सत्ताकेंद्रित दबावगट?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे जिल्ह्यात पंचायत समिती सभापतींची असोसिएशन स्थापन झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र या घडामोडीकडे केवळ प्रशासकीय एकजूट म्हणून न पाहता, त्यामागील राजकीय आणि सत्तासमीकरणांच्या शक्यतांवर गंभीर प्रश्न उपस्थित होणे आवश्यक आहे.

पुणे जिल्हा परिषदेच्या सभागृहात झालेल्या बैठकीत सर्वपक्षीय पंचायत समिती सभापती एकत्र येऊन ही संघटना स्थापन करण्यात आल्याचे सांगितले जाते.

आंबेगावचे कैलास काळे यांची अध्यक्षपदी, हवेलीचे युवराज काकडे यांची उपाध्यक्षपदी आणि बारामतीचे किरण तावरे यांची सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. ही रचना पाहता, स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्व एका नव्या सामूहिक दबावगटाच्या स्वरूपात संघटित होत असल्याचे स्पष्ट होते.

या असोसिएशनचा उद्देश पंचायत समित्यांच्या समस्या, अधिकार, निधी आणि विकासकामांशी संबंधित अडचणी सोडवणे असा सांगितला जात असला, तरी प्रत्यक्षात हे एक स्वतंत्र राजकीय लॉबी-गट तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि राज्य सरकार यांच्यातील अधिकारांचे अस्पष्ट सीमांकन लक्षात घेता, अशा संघटनांमुळे आणखी एक प्रभावशाली सत्ताकेंद्र निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते.

या बैठकीत विविध तालुक्यांचे सभापती उपस्थित राहून स्थानिक अडचणी आणि विकासकामांवर सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

विशेष म्हणजे, राज्यस्तरावर प्रभाव टाकण्यासाठी उपमुख्यमंत्री आणि इतर वरिष्ठ राजकीय नेत्यांची भेट घेण्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्यामुळे ही संघटना केवळ प्रशासकीय समन्वयापुरती मर्यादित राहणार की भविष्यातील राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकणारा गट ठरणार, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो.

एकूणच, पुणे जिल्ह्यातील पंचायत समिती सभापतींची ही पहिलीच संघटित हालचाल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहकार्य वाढवेल की नव्या सत्तासंघर्षांना जन्म देईल, हे येणारा काळच स्पष्ट करेल.

# लोककलावंतांची आबाळ दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा

## पहिल्या समरसता लोककला संमेलनाच्या अध्यक्षपदावरून पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** समाजात समरसता वृद्धिंगत करण्याच्या कामात लोककलावंतांचा सहभाग वाढावा या उद्देशाने समरसता लोककला संमेलन आयोजित करण्याचा उपक्रम उल्लेखनीय असला तरी प्रत्यक्षात खुद्द लोक कलावंत अद्यापही उपेक्षितांचे जगणे जगत असून त्यांची आबाळ दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी आग्रही मागणी पहिल्या समरसता लोककला संमेलनाचे अध्यक्ष पद्मश्री रघुवीर खेडेकर यांनी केली.

लोककलावंतांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचाव्या, लोककलावंतांमध्ये विचारांचे आदान प्रदान व्हावे व विविध लोककलांचा रसिकांना परिचय व्हावा, या दृष्टीने राज्याचा सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक संचालनालय आणि समरसता साहित्य परिषद यांच्या वतीने या वर्षापासून समरसता लोककला संमेलन आयोजित करण्यात येत आहे. या पहिल्या संमेलनात ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी नर्तिका मधू कांबीकर यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे त्या अनुपस्थित असल्याने त्यांच्या वतीने त्यांच्या भगिनी रत्ना कांबीकर यांनी स्वीकारला.

यावेळी मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आलेगांवकर,



लोककलावंत नंदेश उमप, पद्मश्री वितहाबाई नारायणगावकर यांच्या कन्या मंगला बनसोडे, लीला गांधी, जयमाला इनामदार, सुरेखा पुणेकर, छाया आणि माया खुतेगावकर, राधा खुडे, बिग बॉस फेम अहिराणी गायक सचिन कुमावत, नृत्यांगना वैशाली जाधव, रेशमा मुसळे, अनिल मोरे, सांस्कृतिक कार्य संचालनायाच्या जान्हवी जानकर, वारकरी परिषदेचे अध्यक्ष विश्वनाथ गराडकर, भाजप शहराध्यक्ष आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष धीरज घाटे, संमेलनाचे आयोजक धनंजय खुडे, निलेश गद्रे, डॉ प्रसन्न पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

समाजात एकोपा वाढावा, विचारांची देवाण-घेवाण व्हावी, म्हणजेच सामाजिक समरसता! लोक कलावंत आपल्या कलेच्या माध्यमातून शतकानुशतके प्रबोधनाचे, सांस्कृतिक आदान प्रदानाचे आणि सलोखा निर्माण करण्याचे कार्य परंपरेने करीत आहेत. मात्र, लोक कलावंतांचे स्वतःचे जगणे अजूनही आव्हानात्मक स्वरूपाचे आहे, याकडे खेडेकर यांनी आपल्या भाषणात लक्ष वेधले. शासनाच्या लोककलावंतांकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी लोक कलावंत निश्चितपणे पुढे येतील. मात्र, लोककलावंतांकडे आजही गावकुसाबाहेर असल्याप्रमाणे बघितले जात आहे. आपली कला सादर करण्यासाठी गावोगाव फिरणाऱ्या कलावंतांना प्रस्थापितांकडून अन्याय सहन करावा लागतो. स्थानिक पोलिस आणि प्रशासन देखील कलावंतांच्या तक्रारींची दखल न घेता प्रस्थापितांची पाठराखण करतात. हे सर्व आम्हाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या कानावर घालायचे होते. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीने आमची निराशा झाली, असे परखड मतही खेडेकर यांनी व्यक्त केले. समाजात साहित्य आणि संस्कृतीच्या माध्यमातून समरसता निर्माण करण्याच्या दृष्टीने समरसचा साहित्य परिषद २५ वर्षांपासून कार्यरत आहे. यावर्षीपासून आयोजित करण्यात येत असलेल्या समरसता लोककला संमेलनाचे स्वरूप केवळ उत्सवी नाही. लोककलावंतांच्या अडचणी सरकारपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने दुवा निर्माण करणे आणि समाज प्रबोधनाच्या प्रक्रियेत लोककलावंतांचा सहभाग वाढविणे, ही या आयोजनातील प्रमुख उद्दिष्ट आहेत.

## सारांश वृत्त

### व्हॉट्सअॅपवर आता मोबाईल नंबरशिवाय करता येणार चॅटिंग, येतंय 'युझरनेम' फीचर : सीईओ शाह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** दररोजच्या जगण्यात व्हॉट्सअॅप किती महत्त्वाचे बनले आहे, याची कल्पना आपल्या सगळ्यांनाच आहे. आपल्या रोजच्या जगण्यात व्हॉट्सअॅप संवाद सेतूच ठरत आहे. त्यात आता व्हॉट्सअॅप वापरणे आणखी सोपं होणार आहे. कारण कोणाशीही चॅटिंग करायची असेल तर आपला फोन नंबर त्या व्यक्तीला द्यावा लागतो किंवा समोरच्या व्यक्तीचा नंबर आपल्याला सेव्ह करावा लागतो. अनेक वर्षांपासून हे सुरू आहे. मात्र आता नवीन व्यक्तीशी व्हॉट्सअॅपवर बोलण्यासाठी फोन नंबर देण्याची गरज पडणार नाही. कारण मेटा आता युझरनेम हे फीचर घेऊन येत आहे. व्हॉट्सअॅपचे नवे सीईओ कुणाल शाह यांनी या फीचरबद्दल माहिती दिली आहे.

मेटाच्या मालकीच्या या मेसेजिंग प्लॅटफॉर्मने अधिकृतपणे युझरनेम फीचरची घोषणा केली आहे. या नवीन फीचरमुळे लोक मोबाईल नंबरऐवजी एका युनिक युझरनेमचा वापर करून एकमेकांशी संपर्क साधू शकणार आहेत. त्यामुळे तुम्हालाही एखादे खास युझरनेम द्यायचे असेल, तर ते आत्ताच रिझर्व्ह करण्याची वेळ आली आहे, असे व्हॉट्सअॅपने म्हटले आहे. मेटाने दिलेल्या माहितीनुसार, या वर्षाच्या म्हणजे २०२६ च्या शेवटी हे फीचर जागतिक स्तरावर लाँच केले जाईल, परंतु त्यापूर्वी २९ जूनपासून व्हॉट्सअॅपने युझरनेम रिझर्व्ह करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ज्या देशांमध्ये ही सुविधा उपलब्ध होईल, तेथील यूजर्संना अॅपमध्ये एक नोटिफिकेशन पाठवले जाणार आहे.

एक्सवरील (पूर्वीचे ट्विटर) एका अधिकृत पोस्टमध्ये व्हॉट्सअॅपचे सीईओ कुणाल शाह यांनी सांगितले की, हे फीचर लोकांसाठी उपलब्ध होण्यापूर्वीच त्यांनी स्वतः चे युझरनेम आरक्षित केले आहे. शाह यांनी लिहिले, ''वेळ सर्वात महत्वाची असते. हे फीचर जगासाठी रोल आउट होण्यापूर्वीच मी व्हॉट्सअॅपवर माझे युझरनेम क्लेम केले आहे.

# १४६ कोटींची रोकड अन् सोन्यानं भरलेले तळघर, इराकी खासदाराच्या घरात नोटांचा डोंगर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अंतर्गत अस्थिरतेने पिचलेल्या इराकमध्ये भ्रष्टाचाराचे एक मोठे प्रकरण समोर आले आहे. येथे भ्रष्टाचाराच्या आरोपावरून अनेक नेत्यांच्या घरांवर सातत्याने छापे टाकले जात आहेत. या मालिकेतच इराकी खासदार आलिया नासिफ यांच्या घरावर टाकलेल्या छाप्यात तब्बल २० अब्ज इराकी दीनार अर्थात १४६ कोटी रुपयांची रोकड आणि मोठ्या प्रमाणावर सोने जप्त करण्यात आले आहे. खासदार आलिया नासिफ या माजी पंतप्रधान मोहम्मद शिया अल सुदानी यांच्या चीफ ऑफ स्टाफ राहिल्या आहेत. बगदादच्या ग्रीन झोनमध्ये इराकच्या काउंटर टेररिझम सर्व्हिसच्या विशेष पथकाद्वारे रविवारी (२८ जून २०२६) पहाटे हा छापा टाकला.

तत्पूर्वी, इराकमध्ये अली अल जैदी यांनी मे २०२६ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर देशातील भ्रष्टाचाराचे नेटवर्क पूर्णपणे उद्ध्वस्त करण्याची घोषणा केली होती. संबंधित कारवाईदरम्यान एका रूममध्ये नोटांचे ढीग असल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. या संपूर्ण ऑपरेशनमध्ये ८५ दशलक्ष



डॉलर्स अर्थात तब्बल ८०५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. या कारवाईच्या भीतीने अनेक संशयित अधिकारी फरार झाले आहेत. या कारवाईनंतर, ग्रीन झोनचे प्रवेशद्वार सील करण्यात आले आहेत.

मे २०२६ च्या अखेरीस ताब्यात घेतलेले माजी उप तेल शुद्धीकरण मंत्री अदनान अल जुमैली यांनी दिलेल्या जबाबाच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

यापूर्वीही, इराकी अधिकाऱ्यांनी सरकारी कोषागारातून लुटलेले १०७ मिलियन डॉलर्स अर्थात १००० कोटी रुपयांपेक्षाही अधिक जप्त केले आहेत. खरे तर इराकमध्ये भ्रष्टाचार विरोधी माहीमच सुरू करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायिक परिषदेनुसार, खाजगी घरांखाली ९८ अब्ज इराकी दिनार (७०७ कोटी) आणि ११ मिलीयन डॉलर (१०४ कोटी) रोख रक्कम जप्त करण्यात आली. काही रोकड तर एवढी खाली पुरण्यात आली होती की, ती बाहेर काढण्यासाठी अवजड यंत्रसामग्रीही मागवावी लागली. या तपासादरम्यान मोठ्या प्रमाणात सोने आणि शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.

# ५५ कोटींचं ३७ किलो २४ कॅरेट सोनं; महाराष्ट्राच्या अक्षय बनसोडेचा दोन महिने गुवाहाटीत मुक्काम, पण पोलिसांनी पकडलाच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी :** सांगली जिल्ह्यातील अक्षय बनसोड या तरुणाला आसाममधील गुवाहाटीतमध्ये अटक करण्यात आली. त्याच्याजवळ ५५ कोटी रुपये किंमत असलेले ३७ किलो २४ कॅरेट सोने सापडले. पोलिसांनी त्याला अटक केली असून, अटकेवेळी त्याच्याजवळ चार मोबाइलही मिळाले आहेत.

आसाम पोलिसांकडून सोने तस्करीच्या प्रकरणातील आरोपीचा शोध घेणे सुरू होते. पोलिसांना तस्करीबद्दल माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. त्यावेळी अक्षय बनसोडेजवळ तब्बल ३७ किलो सोन्याची बिस्किटे मिळाली.

५५ कोटी रुपयांची सोन्याची बिस्किटे जप्त

पोलिसांनी सांगितले की, ''आसाम पोलिसांनी आतापर्यंतचा सर्वात मोठा तस्करीच्या सोन्याचा साठा जप्त केला आहे. या सोन्याचे बाजारमूल्य ५५ कोटींपेक्षा जास्त आहे. जप्त करण्यात आलेले सोने ३७ किलो आहे. आम्हाला प्राथमिक माहिती मिळाली होती, पण त्याबद्दल खात्री नव्हती. आम्ही या व्यक्तीला बऱ्याच काळापासून शोधत होतो. काल रात्री आम्ही ठिकाण शोधले. आम्ही पथकासह गेलो होतो.''

''आम्ही त्या ठिकाणी गेल्यानंतर एक सामान्य माणूस दिसला. त्याच्याकडे तो बॅग होत्या. आम्ही त्याची झाडाझडती घेतली, तेव्हा त्याच्याजवळ ३७ किलो २४ कॅरेट सोन्याची बिस्किटे सापडली. त्याचबरोबर १३ ग्रॅम चांदी, चार मोबाईल त्याच्याजवळून जप्त करण्यात आले. त्यात दोन आयफोन आहेत. दोन अँड्रॉईड मोबाईल आहेत'', अशी माहिती पोलिससांनी दिली.

आंतरराष्ट्रीय सोने तस्करी रॅकेटचा भाग

''अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अक्षय बनसोडे असून, त्याचे वय ३२ वर्ष आहे. तो महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील आहे. हे आंतरराष्ट्रीय सोने तस्करी रॅकेटचाच एक भाग असल्याचे आढळून आले आहे आणि आम्ही आता पुढील तपास करत आहोत'', असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

## यूपीमध्ये आयएएस अधिकाऱ्यांच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह; भाजप नेत्याशी कथित धक्काबुक्की प्रकरणाची चौकशी सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** उत्तर प्रदेशातील जालौन येथे एका आयएएस अधिकाऱ्यावर भाजपच्या स्थानिक नेत्याशी कथित धक्काबुक्की आणि थप्पड मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप झाल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आल्यानंतर राज्य सरकारने प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, एका शासकीय कार्यालयात झालेल्या वादाच्या वेळी आयएएस अधिकारी रिंकू सिंह यांनी भाजपचे ब्लॉक प्रमुख यांच्याशी आक्रमक वर्तन केल्याचा आरोप आहे. संबंधित नेत्याने अधिकाऱ्यांवर धक्का देणे आणि थप्पड मारण्याचा प्रयत्न केल्याचा दावा केला आहे. दुसरीकडे, अधिकाऱ्यांच्या बाजूने अद्याप या आरोपांवर सविस्तर अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. कोणत्याही लोकप्रतिनिधी किंवा नागरिकाशी शासकीय अधिकाऱ्यांनी संयमाने आणि नियमांच्या चौकटीत वागणे अपेक्षित असताना अशा प्रकारच्या आरोपांमुळे प्रशासनाच्या प्रतिमेवर परिणाम होत असल्याची चर्चा सुरू आहे.

राज्य सरकारने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले असून चौकशी अहवालानंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याचे सांगितले आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित आरोपांची अधिकृतपणे पुष्टी झालेली नाही.

## चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर मोठे झाड कोसळले, १२ विद्यार्थी जखमी, एका विद्यार्थ्याचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेंबूर (मुंबई) :** मुंबईत एका नामांकित शाळेच्या बसवर भले मोठे झाड कोसळल्याची घटना घडली. चेंबूरमधील रोड नंबर ११ वर ही मंगळवारी (३० जून) दुपारी ही घटना घडली. झाड कोसळल्याने बसमधील १२ विद्यार्थी जखमी झाले असून, एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. याची माहिती माजी खासदार राहुल शेवाळे यांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील एका खासगी शाळेची ही बस आहे. शाळेची बस विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. त्याचवेळी मोठे झाड शाळेच्या बसवर कोसळले. यात शाळेची बस पूर्णपणे चेपली गेली. यात १२ विद्यार्थी जखमी झाले आहेत. काही विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.



एका विद्यार्थ्याचा मृत्यू

शाळेच्या बसवर झाड कोसळल्याची माहिती माहिती महापालिकेच्या अग्निशामक दलाला माहिती देण्यात आली. त्यानंतर तातडीने जवान घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी तातडीने विद्यार्थ्यांना बाहेर काढले. त्यांना परिसरातील वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, झाड कोसळल्यामुळे बस चेपली गेली आहे. यात एक विद्यार्थी बसमध्येच अडकला होता. त्याला बऱ्याच वेळानंतर बाहेर काढण्यात आले. या घटनेत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. राहुल शेवाळे म्हणाले की, शाळेच्या बसमध्ये १३ ते १५ विद्यार्थी असल्याची माहिती मिळाली. सर्वांना बाहेर काढण्यात आले असून, एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे.

## मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकनावरून वाद; २३ विरोधी पक्षांनी सरन्यायाधीशांकडे धाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बिहारमधील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकन (डशिलळरश्र खपींशपीळींश ठशींळीळेप – डखठ) प्रक्रियेवरून देशात राजकीय वाद तीव्र झाला आहे. काँग्रेससह २३ विरोधी पक्षांनी भारताचे सरन्यायाधीश यांना संयुक्त पत्र लिहून या प्रक्रियेबाबत चिंता व्यक्त केली असून, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

विरोधी पक्षांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, या विशेष पुनरावलोकन प्रक्रियेमुळे मोठ्या प्रमाणावर मतदारांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. अल्प कालावधीत विविध कागदपत्रांची मागणी केल्यामुळे गरीब, स्थलांतरित कामगार, ग्रामीण भागातील नागरिक तसेच वंचित घटकांतील पात्र मतदारांची नावे यादीतून वगळली जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सर्वसमावेशक पद्धतीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

विरोधकांच्या मते, मतदार यादी शुद्ध करण्याचा उद्देश योग्य असला तरी त्याची अंमलबजावणी नागरिकांच्या मतदानाच्या मूलभूत अधिकारावर परिणाम करणारी ठरू नये. मतदारांना वारंवार कागदपत्रे सादर करण्याची सक्ती केल्यास अनेक पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहू शकतात, असा आरोप त्यांनी केला आहे. दुसरीकडे, निवडणूक आयोगाने यापूर्वी स्पष्ट केले आहे की, मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी ही प्रक्रिया आवश्यक आहे. मृत, स्थलांतरित किंवा अपात्र व्यक्तींची नावे वगळणे आणि पात्र मतदारांचा समावेश करणे हे आयोगाचे घटनात्मक कर्तव्य असल्याचे सांगितले जाते.

या घडामोडीमुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदार अधिकार आणि घटनात्मक संस्थांची स्वायत्तता यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. सरन्यायाधीशांना पत्र पाठवल्याने या विषयाला आता घटनात्मक महत्त्व प्राप्त झाले असून, पुढील काळात न्यायालय आणि निवडणूक आयोग या दोघांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

## UAE मध्ये ऐतिहासिक पाऊल: Etihad Rail ची पहिली प्रवासी रेल्वे सेवा सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दुबई :** संयुक्त अरब अमिराती (UAE) ने आपल्या वाहतूक व्यवस्थेत ऐतिहासिक टप्पा गाठत देशातील पहिली प्रवासी रेल्वे सेवा सुरू केली आहे. Etihad Rail द्वारे चालवली जाणारी ही सेवा ३० जून २०२६ रोजी अधिकृतपणे सुरू झाली.

या पहिल्या टप्प्यात अबू धाबी–फुजैरा मार्गावर प्रवासी ट्रेन सुरू करण्यात आली असून, हा प्रवास सुमारे १ तास ४५ मिनिटांत (१०५ मिनिटांत) पूर्ण होतो.

**आधुनिक रेल्वे नेटवर्कचा प्रारंभ**

Etihad Rail प्रकल्प हा UAE च्या ९०० किलोमीटर लांबीच्या राष्ट्रीय रेल्वे नेटवर्कचा भाग आहे.


### या पहिल्या प्रवासी सेवेच्या माध्यमातून

- अबू धाबी ते फुजैरा जलद प्रवास शक्य झाला आहे
- रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होण्याची अपेक्षा आहे
- पर्यटन आणि आर्थिक व्यवहारांना गती मिळणार आहे

**सुविधा आणि वैशिष्ट्ये**

- Etihad Rail च्या या आधुनिक ट्रेनमध्ये:
- सुमारे २०० किमी प्रतितास वेगाने प्रवास
- एका ट्रेनमध्ये सुमारे ४०० प्रवाशांची क्षमता
- आरामदायी सीटिंग आणि आधुनिक सुविधा
- डिजिटल तिकीट प्रणाली आणि स्मार्ट सेवा


याशिवाय, भविष्यात दुबई, शारजा आणि इतर प्रमुख शहरांपर्यंत या नेटवर्कचा विस्तार होणार आहे.



या प्रकल्पाद्वारे भविष्यात देशातील ११ प्रमुख शहरे आणि प्रदेश जोडले जाणार आहेत.

महत्त्व : Etihad Rail ची ही सुरुवात णअए साठी केवळ नवीन प्रवास पर्याय नसून, आधुनिक, वेगवान आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## इराणचा दोहा डाव आणि भारतासमोरील नवे आव्हान : युद्ध थांबले तरी संकट संपलेले नाही



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दोहा (इराण) :** अमेरिका–इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणने कतारमधील गोठवून ठेवलेल्या अब्जावधी डॉलरच्या निधीच्या मुक्ततेसाठी दोहा येथे तांत्रिक पथक पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र अमेरिकेशी कोणतीही थेट चर्चा होणार नसल्याचे इराणने स्पष्ट केले आहे. या भूमिकेमुळे पश्चिम आशियातील तणाव अद्याप कायम असल्याचे दिसून येते. हा केवळ आर्थिक व्यवहार नसून जागतिक सामरिक समीकरणांमध्ये सुरू असलेल्या शक्तीसंघर्षाचा महत्त्वाचा टप्पा आहे.

भारतासाठी ही घडामोड अत्यंत महत्त्वाची आहे. कारण भारताच्या ऊर्जा सुरक्षेचा मोठा भाग पश्चिम आशियावर अवलंबून आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत पुन्हा तणाव निर्माण झाला किंवा जहाजवाहतुकीवर परिणाम झाला तर त्याचा सर्वात मोठा फटका भारताला बसू शकतो. कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्यास महागाई, वाहतूक खर्च, खतांचे दर आणि औद्योगिक उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे इराणचा प्रत्येक राजनैतिक निर्णय भारतासाठी केवळ परराष्ट्र धोरणाचा विषय राहत नाही, तर तो थेट अर्थव्यवस्थेशी जोडला जातो. इराणला गोठवलेला निधी मिळाल्यास त्याची आर्थिक क्षमता वाढेल. त्यामुळे अमेरिकेच्या निर्बंधांचा प्रभाव काही प्रमाणात कमी होऊ शकतो. याचा परिणाम म्हणजे पश्चिम आशियात इराणचा प्रभाव पुन्हा मजबूत होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत भारताला एकाच वेळी अमेरिका, इस्रायल, इराण आणि आखाती देश यांच्याशी संतुलित संबंध राखण्याचे मोठे आव्हान उभे राहील. भारताने गेल्या काही वर्षांत इस्रायलशी संरक्षण सहकार्य वाढवले असले तरी इराणचे सामरिक महत्त्व अजूनही कमी झालेले नाही. चाबहार बंदर, मध्य आशियाकडे जाणारे व्यापारमार्ग आणि ऊर्जा सुरक्षा यासाठी इराण भारताचा महत्त्वाचा भागीदार आहे. त्यामुळे भारताला कोणत्याही एका गटाच्या बाजूने उभे राहण्याऐवजी संतुलित आणि व्यवहार्य भूमिका कायम ठेवावी लागेल. या संघर्षाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे भारतीय नागरिकांची सुरक्षितता. आखाती देशांमध्ये लाखो भारतीय काम करतात. युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्यांचे रोजगार, सुरक्षितता आणि भारतात येणारी परदेशी चलनरक्कम यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भारत सरकारला परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आवश्यक असल्यास स्थलांतर आणि बचाव योजना तयार ठेवाव्या लागतील. भारतासाठी ही संधीही ठरू शकते. जर अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव हळूहळू कमी झाला तर भविष्यात भारतीय कंपन्यांना इराणमध्ये ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि व्यापार क्षेत्रात गुंतवणुकीच्या नवीन संधी उपलब्ध होऊ शकतात. परंतु संघर्ष पुन्हा तीव्र झाल्यास या सर्व शक्यता धोक्यात येतील. या संपूर्ण घडामोडीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जागतिक राजकारणात आर्थिक निर्बंध हे आता युद्धाइतकेच प्रभावी शस्त्र बनले आहेत. गोठवलेला निधी मुक्त होणे किंवा न होणे यावर एखाद्या देशाची आर्थिक क्षमता, संरक्षण धोरण आणि प्रादेशिक प्रभाव अवलंबून राहू शकतो. त्यामुळे दोहा येथील ही हालचाल केवळ आर्थिक नाही, तर व्यापक भू-राजकीय संदेश देणारी आहे. भारताने या परिस्थितीत तीन गोष्टींवर भर देणे आवश्यक आहेऊर्जा आयातीचे विविधीकरण, सामरिक तेलसाठ्याची वाढ आणि सर्व संबंधित देशांशी संतुलित राजनैतिक संवाद. कारण पश्चिम आशियातील प्रत्येक संघर्ष भारताच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम करतो.